# जाहिर दरपत्रक सुचना

जा.क्र.वविशम/मा.तं/३६५/२३-२४
दि. १८/१२/२०२३

वसई विरार शहर महानगरपालिकेतील ऑनलाईन ई-निविदा करीता अधिका-यांचे डिजीटल सर्टिफिकेट बनविणेकामी एजन्सी नियुक्त करणेस जाहीर दरपत्रक सुचना www.vvcmc.in या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (सी), चंदनसार येथे दुस-या मजल्यावरील सुचनाफलकावर प्रसिध्द करुन दि. १९/१२/ २०२३ रोजी ११.०० वाजल्यापासून ते दि.२६/१२/२०२३ रोजी ४.०० वाजेपर्यत या कालावधीत इच्छूक संस्था व पुरवठदार यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दि२६/१२/२०२३ रोजी ४.०० वाजेपर्यत प्रभाग समिती (सी), चंदनसार दुसरा मजला, माहिती तंत्रज्ञान विभागात सादर करावे. प्राप्त झालेले दरपत्रक दि२६/१२/ २०२३ रोजी दु.४.३० वाजता शक्य झाल्यास ठेकेदार स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष मा.उपायुक्त (माहिती तंत्रज्ञान विभाग) यांच्या दालनात उघडण्यात येतील.

| अनु.क्र. | अधिकारी/कर्मचारी | नग | प्रति नग रक्कम (सर्व करांसहित) | एकूण रक्कम (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|---|
| १ | डिजीटल सिग्नेचर (Digital Signature) Class-३ (कालावधी २ वर्ष) | ३१ | | |

**अटी व शर्ती**

१. उशीराने आलेले, अर्धवट भरलेले, खाडाखोड करुन साक्षांकित केलेले व सशर्त दरपत्रक फेटाळण्यात येतील.
२. दरपत्रकांचे लिफाफे सिल केलेले असावेत, एकदा सादर केलेली दरपत्रके विनंती अर्ज देवूनही परत घेता येणार नाही.
३. ठेकेदाराने दर सादर करताना कामाची पाहणी करून सर्व करांसहीत दर सादर करावेत.
४. दरपत्रक धारकांने आपल्या कंपनीचे पॅनकार्ड, GST, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र बंद लिफाफ्यामध्ये सादर करावे.
५. सदर दरपत्रकासोबत कामाच्या १% इसारा रक्कम रु. २४४०/- इतकी डिमांड ड्राफ्ट द्वारे जमा करावयाची आहे.
६. प्राप्त दरपत्रकातील L१ दरपत्रकधाराकाचे दर मंजूर होवून सदर कामाचा कार्यादेश दिल्यांनतर उर्वरित दरपत्रकधारकांची इसारा रक्कम परत करण्यात येईल.
७. मंजूर ठेकेदारास आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.
८. कामाबाबत काही वादविवाद निर्माण झाल्यास महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील व त्याचे पालन दरपत्रकधारकांस बंधकारक राहील.
९. फक्त पात्र निविदाकारांनी सादर केलेले दरपत्रक विचारात घेण्यात येतील L१ चा निर्णय वित्तीय लिफाफ्यातील एकूण रक्कमेच्या आधारे घेण्यात येईल.
१०. मंजूर L१ दरपत्रकधारकास कामाच्या ३% सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे अनिवार्य राहील.
११. मुदतीत प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.उपायुक्त, माहिती तंत्रज्ञान विभाग यांना राहील.
१२. कमी दराच्या ठेकेदारास ५००/- रुपयांच्या स्टॅम पेपर वरती करारनामा करून द्यावा लागेल.
१३. बिल अदा केल्यानंतर लेखापरिक्षणास काही आक्षेप निघाल्यास त्याची पुर्तता करून देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.



उपायुक्त
माहिती तंत्रज्ञान विभाग